जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 SEP 2021

पुढारी

शिवाजी विद्यापीठाच्या ऑनलाईन परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षांतर्गत 'एमपीएससी' परीक्षेमुळे ४ सप्टेंबर रोजी न झालेल्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा रविवारी (दि. ५) सुरळीत झाल्या. १२ हजारांपैकी ११ हजार ४९९ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील मार्च - एप्रिल २०२१ च्या परीक्षा १० ऑगस्टपासून ऑनलाईन पद्धतीने सुरळीत सुरू झाल्या आहेत. रविवारी बीए., बीकॉम, बीएस्सी, एमए, एमकॉम, एमएस्सी, बॅचलर ऑफ इंटेरिअर डिझाईन, बॅचलर ऑफ ड्रेस मेकिंग अँड फॅशन, एमएमएस्सी-गणित, बी-टेक सर्व शाखा, बीसीए, एमसीए, एमएसडब्ल्यू, एमआरएस, एमपीए, एमजे, बी. व्होक. आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा शांततेत झाल्या, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.

06 SEP 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विद्यापीठाचे कामकाज आजपासून सुरू

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठातील प्रशासकीय कार्यालय व अधिविभागाची गरज लक्षात घेऊन शैक्षणिक व प्रशासकीय कामकाज सोमवार, दि. ६ पासून शिक्षक, अधिकारी व शिक्षकेतर सेवकांच्या १०० टक्के उपस्थितीने नियमित वेळेत पूर्ण क्षमतेने सुरू राहणार आहे. 'ब्रेक द चेन'अंतर्गत सुधारित मार्गदर्शक सूचना व कार्यालयीन उपस्थितीबाबत कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी परिपत्रक काढले आहे.

सर्व शिक्षक, अधिकारी व शिक्षकेतर सेवकांनी कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरण प्राधान्याने पूर्ण करून घ्यावे. आदेशातील निर्बंध, अटी व शर्ती विचारात घेऊन अधिविभाग व प्रशासकीय विभाग यांनी आवश्यक ती कार्यवाही व उपाययोजनांची अंमलबजावणी करावी, असे परिपत्रकात म्हटले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 SEP 2021

पुढारी

टाटा केमिकलचे सीईओ आर. मुकुंदन यांचे शिवाजी विद्यापीठात उद्या व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाच्या वतीने मंगळवारी (दि. ७) टाटा केमिकलचे सीईओ आर. मुकुंदन यांचे झूम ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर दुपारी २.४५ वाजता व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. 'इनोव्हेटिंग लीव्हरेजिंग सस्टेनेबिलिटी आणि डिजिटल ऑपॉर्च्युनिटी इन इंडिया' या विषयावर ते मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. यशवंत थोरात आदी उपस्थित राहणार आहेत. ब्याख्यानात विद्यार्थी, संशोधक, शिक्षक व अभ्यासकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन विभागप्रमुख प्रा. ज्ञानदेव तळूले यांनी केले आहे.

06 SEP 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

भूजल सर्वेक्षण यंत्रणेसमवेत विद्यापीठाचा सामंजस्य करार

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

राज्य भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा व शिवाजी विद्यापीठाचा भूगोलशास्त्र अधिविभाग यांच्यादरम्यान सामंजस्य करार झाला. या करारामुळे भूजल सर्वेक्षणातील संशोधनास विद्यापीठाची मोठी मदत होणार असून विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासालाही चालना मिळेल, अशी भावना भूजल सर्वेक्षण विभाग व विकास यंत्रणा विभागाचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी व्यक्त केली.

याप्रसंगी कलशेट्टी व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. करारामुळे विद्यापीठाच्या भूगोलशास्त्र अधिविभागातील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेकडील तंत्रज्ञान, क्षेत्रीय अभ्यास यांची माहिती प्राप्त होणार आहे. यावेळी डॉ. आर. के. कामत, भूवैज्ञानिक ऋषिकेश गोसकी, भूगोल अधिविभागाचे प्रमुख डॉ. एस. डी. शिंदे, डॉ. एस. एस. पन्हाळकर, डॉ. एस. के. पवार, डॉ. मीना पोतदार आदी उपस्थित होते.

कोल्हापूर : राज्य भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा सामंजस्य करारप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासमवेत भूवैज्ञानिक व शिक्षक.

करारांतर्गत भूजल व भूशास्त्र विषयक विविध संशोधन उपक्रम, भूजलविषयक अध्यापन व प्रशिक्षण, भूजल मॉडेलिंग, पर्यावरण प्रभाव आणि विश्लेषण, सुदूर संवेदन, भूशास्त्र व भूजलविषयक माहिती, भूजल गुणवत्ता व पाणी तपासणी, सुविधांबाबत तज्ज्ञांमार्फत मार्गदर्शन सल्ला मिळणारआहे. शासकीय उपक्रम व योजनांमध्ये क्षेत्रीय काम करण्याची अनुमती व भू-भौतिक, चुंबकीय व विद्युत चुंबकीय सर्वेक्षण, गुरुत्वीय व भूकंप इत्यादींबाबत संयुक्त संशोधन, अभ्यास व क्षेत्रीय काम या घटका संबंधित काम करता येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 SEP 2021

पुढारी

जिज्ञासू शेतकरी घेताहेत ऑनलाईन शिक्षणाचे धडे!

४६ जणांचा प्रवेश; विद्यापीठाची परीक्षा दिली

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

कोव्हिड-१९ च्या संकटाने शिक्षणाची, जगण्याची सर्व परिमाणे बदलून टाकली असताना नव्या 'न्यू नॉर्मल'शी जोडून घेण्यामध्ये शेतकरी बांधवही मागे नाहीत. याची प्रचिती शिवाजी विद्यापीठाच्या रेशीमशास्त्र विषयातील पदविका अभ्यासक्रमांसाठी राज्याच्या विविध भागांतील ४६ शेतकऱ्यांनी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या निमित्ताने आली आहे. ऑनलाईन शिक्षणाचे धडे गिरवून अभ्यासक्रम पूर्ण केला असून ते ऑनलाईन परीक्षाही यशस्वीपणे देत आहेत. शेतकऱ्यांची ही जिज्ञासा तरुण विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातील सेंटर ऑफ एक्सलन्स ॲन्ड इनक्युबेशन इन सेरीकल्चर यांच्यामार्फत २०१७-१८ पासून रेशीमशास्त्र पदविका व पदव्युत्तर पदविका हे अभ्यासक्रम खास शेतकऱ्यांसाठी सुरू करण्यात आले. देशातील अकृषी व कृषी विद्यापीठांत अशा प्रकारचा अभ्यासक्रम चालविणारे शिवाजी विद्यापीठ पहिले व एकमेव आहे. दरवर्षी पदविका व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांसाठी प्रत्येकी

४० जागांवर रेशीमशेती करू इच्छिणारे तसेच त्याविषयी अभ्यास करू इच्छिणारे शेतकरी प्रवेश घेतात. कौशल्याला शास्त्रीय ज्ञानाची जोड मिळाल्याने त्यातील अनेक यशस्वी रेशीम उद्योजक बनले आहेत. गेल्या वर्षभरात कोरोनाचा प्रादुर्भाव असतानाही शेतकरी या अभ्यासक्रमात ऑनलाईन सहभागी झाले. चार विषयांसाठीची ऑनलाईन व्याख्याने, एक प्रात्यक्षिक पेपर व एका प्रकल्पाद्वारे त्यांनी ऑनलाईन अभ्यासक्रम पूर्ण केला. शेतकऱ्यांच्या ऑनलाईन परीक्षेला सुरू झाली आहे. खाद्यवनस्पती लागवड व व्यवस्थापन या विषयाची ऑनलाईन परीक्षा ४६ शेतकऱ्यांनी यशस्वीरीत्या दिली. प्राणीशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. ए.ए. देशमुख, रेशीमशास्त्र अभ्यासक्रम समन्वयक डॉ. ए. डी. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा प्रमुख डॉ. अण्णा गोफणे यासाठी परिश्रम घेत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

06 SEP 2021

तरुण भारत

विद्यापीठाचे प्रशासकीय कामकाज आजपासून नियमित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय कामकाज आजपासून (दि. ६) नियमित वेळेत व पूर्ण क्षमतेने सुरु करण्याचा निर्णय शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने घेतला आहे. प्रशासकीय कार्यालयाची व अधिविभागाची निकड लक्षात घेता हा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. त्यानुसार सर्व शिक्षक, अधिकारी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी १०० टक्के उपस्थिती ठेवण्याचे आवाहन कुलसचिव विलास नांदवडेकर यांनी केले आहे.

कुलसचिव नांदवडेकर यांनी आवाहन करताना म्हटले आहे, सर्वांनी लसीकरण प्राधान्याने पूर्ण करुन घ्यावे. 'ब्रेक द चेन'अंतर्गत सुधारित मार्गदर्शक सूचनानुसार कार्यालयीन उपस्थितीबाबत हा निर्णय घेण्यात आला आहे. गेल्यावर्षी कोरोना महामारी उद्भवल्यानंतर कार्यालयीन कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीवर मर्यादा आणल्या होत्या. सध्या कोरोनाचा प्रादुर्भाव कमी होत आहे. यामुळे 'ब्रेक द चेन'अंतर्गत कार्यालयीन उपस्थिती १०० टक्के संबंधी निर्णय घेतला आहे. गेल्या दीड वर्षाच्या कालावधीत कोरोनाचे संकट, लॉकडाऊनचा कालावधी आणि कर्मचाऱ्यांची कमी संख्या यामुळे प्रशासकीय कामकाजावर परिणाम झाल्याचे विद्यापीठातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. पण पुन्हा आता आजपासून नियमित कामकाज सुरु होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 SEP 2021

सकाळ

जिज्ञासू शेतकरी देताहेत ऑनलाईन परीक्षा

कोल्हापूर, ता. ५ : कोरोनाच्या महामारीने शिक्षणाची, जगण्याची सर्व परिमाणे बदलून टाकली असताना या नव्या 'न्यू नॉर्मल' शी जोडून घेण्यामध्ये आपले शेतकरी बांधवही मागे नाहीत. याची प्रचिती शिवाजी विद्यापीठाच्या रेशीमशास्त्र विषयातील पदविका अभ्यासक्रमांदरम्यान आली. राज्याच्या विविध भागांतील ४६ शेतकऱ्यांनी हे अभ्यासक्रम ऑनलाईन पूर्ण केलेच; शिवाय, ते ऑनलाईन परीक्षाही यशस्वीपणे देत आहेत. नवतंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतीतील नवे ज्ञान आत्मसात करण्याची या शेतकऱ्यांची जिज्ञासा तरुण विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक ठरली आहे.

प्राणीशास्त्र अधिविभागातील सेंटर ऑफ एक्सलन्स ॲन्ड इनक्युबेशन इन सेरिकल्चर यांच्यामार्फत २०१७-१८ पासून रेशीमशास्त्र पदविका आणि पदव्युत्तर पदविका हे अभ्यासक्रम सुरू केले. दरवर्षी पदविका व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांसाठी प्रत्येकी ४० जागांवर रेशीमशेती करू इच्छिणारे, तसेच त्याविषयी अभ्यास करू इच्छिणारे शेतकरी प्रवेश घेतात. त्यांनी चार विषयांसाठीचा ऑनलाईन अभ्यासक्रम पूर्ण केला. ऑनलाईन परीक्षेला कालपासून सुरवात झाली. खाद्यवनस्पती लागवड व व्यवस्थापन या विषयाची ऑनलाईन परीक्षा झाली. परीक्षा ९ सप्टेंबरपर्यंत चालणार आहे. यासाठी प्राणीशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. ए. ए. देशमुख, रेशीमशास्त्र अभ्यासक्रम समन्वयक डॉ. ए. डी. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा प्रमुख डॉ. अण्णा गोफणे परीक्षा घेत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 SEP 2021
सकाळ

भूजल सर्वेक्षण, विकास यंत्रणेशी विद्यापीठाचा सामंजस्य करार

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ५ : राज्याची भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा आणि शिवाजी विद्यापीठाचा भूगोलशास्त्र अधिविभाग यांच्यादरम्यान सामंजस्य करार झाला. या करारामुळे भूजल सर्वेक्षणातील संशोधनास विद्यापीठाची मोठी मदत होणार असून विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासालाही चालना मिळेल, असे मत भूजल सर्वेक्षण विभाग व विकास यंत्रणा विभागाचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी व्यक्त केले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा करार झाला.

भूजल क्षेत्रातील उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांना संशोधनातील संधी उपलब्ध करून देण्यासाठी तसेच अद्ययावत तंत्रज्ञानात्मक माहितीची देवाण-घेवाणीसाठी हा करार अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. या करारामुळे विद्यापीठाच्या भूगोलशास्त्र अधिविभागातील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेकडील तंत्रज्ञान, क्षेत्रीय अभ्यास यांची माहिती प्राप्त करण्याबरोबरच त्यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांमध्ये सहभागी होता येणार आहे.

या कराराअंतर्गत भूजल व भूशास्त्र विषयक विविध संशोधन उपक्रम, भूजलविषयक अध्यापन आणि प्रशिक्षण, भूजल मॉडेलिंग, पर्यावरण प्रभाव आणि विश्लेषण, सुदूर संवेदन (रिमोट सेन्सिंग), भौगोलिक माहिती प्रणाली व तंत्रज्ञान (जीआयएस), भूशास्त्र व भूजल विषयक माहिती, तंत्रज्ञान व्यवस्थापन व हस्तांतरण, भूजल गुणवत्ता व पाणी तपासणी, सुविधांबाबत तज्ज्ञांमार्फत मार्गदर्शन सल्ला व आवश्यक सहाय्य, शासकीय योजनांमध्ये क्षेत्रीय काम करण्याची अनुमती आणि भू-भौतिक, चुंबकीय व विद्युत चुंबकीय सर्वेक्षण तसेच गुरुत्वीय व भूकंप इत्यादींबाबत संयुक्त संशोधन, इत्यादी घटकांसंबंधित काम करता येणार आहे. यावेळी डॉ. आर. के. कामत, भूवैज्ञानिक ऋषिकेश गोसकी, भूगोल अधिविभागाचे प्रमुख डॉ. एस. डी. शिंदे, डॉ. एस. एस. पन्हाळकर, डॉ. एस. के. पवार, डॉ. मीना पोतदार आदी उपस्थित होते.

06 SEP 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा भूजल सर्वेक्षण यंत्रणेसमवेत सामंजस्य करार

कोल्हापूर : प्रतिनिधी

राज्यांची भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा आणि शिवाजी विद्यापीठाचा भूगोलशास्त्र अधिविभाग यांच्यादरम्यान शनिवारी सामंजस्य करार करण्यात आला. या करारामुळे भूजल सर्वेक्षणातील संशोधनास विद्यापीठाची मोठी मदत होणार असून, विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासालाही चालना मिळेल, अशी प्रतिक्रिया भूजल सर्वेक्षण विभाग व विकास यंत्रणा विभागाचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी व्यक्त केली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा करार करण्यात आला.

कोल्हापूर : सामंजस्य करारप्रसंगी कुलगुरू डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू पी. एस. पाटील यांच्यासमवेत भूवैज्ञानिक व शिक्षक.

भूजल क्षेत्रातील उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांना संशोधनातील संधी उपलब्ध करून देण्यासाठी तसेच अद्ययावत तंत्रज्ञानात्मक माहितीची देवाण-घेवाण करण्यासाठी हा सामंजस्य करार अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. या करारामुळे विद्यापीठाच्या भूगोलशास्त्र अधिविभागातील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेकडील तंत्रज्ञान, क्षेत्रीय अभ्यास यांची माहिती प्राप्त करण्याबरोबरच त्यांच्यामार्फत राबवण्यात येणाऱ्या प्रकल्पांमध्ये सहभागी होता येणार आहे. तसेच संयुक्त प्रकल्पही राबवता येणार आहेत. या करारांतर्गत भूजल व भूशास्त्रविषयक विविध संशोधन उपक्रम, भूजलविषयक अध्यापन आणि प्रशिक्षण, भूजल मॉडेलिंग, पर्यावरण प्रभाव आणि विश्लेषण, रिमोट सेंसिग, भौगोलिक माहिती प्रणाली व तंत्रज्ञान,ंत्रज्ञान व्यवस्थापन व हस्तांतरण, भूजल गुणवत्ता व पाणी तपासणी, सुविधांबाबत तज्ज्ञांमार्फत मार्गदर्शन सल्ला व आवश्यक साहाय्य, अभ्यास व क्षेत्रीय काम इत्यादी घटकांसंबंधित काम करता येणार आहे.

याप्रसंगी भूजल सर्वेक्षण विभाग व विकास यंत्रणा विभागाचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी व शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या. यावेळी आर. के. कामत, ऋषीकेश गोसकी, एस. डी. शिंदे, एस. एस. पन्हाळकर, एस. के. पवार, मीना पोतदार आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 SEP 2021

लोकमत

विद्यापीठात आजपासून शंभर टक्के उपस्थिती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आज, सोमवारपासून शिक्षक, अधिकारी, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची शंभर टक्के उपस्थिती राहणार आहे. विद्यापीठातील प्रशासकीय कार्यालय आणि अधिविभागांची गरज लक्षात घेऊन शैक्षणिक, प्रशासकीय कामकाज नियमित वेळेत पूर्ण क्षमतेने सुरू होणार आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने सुधारित निर्देश पारित केले आहेत. त्यानुसार जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने आदेश पारित केले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 SEP 2021

लोकमत

शेतकरी देताहेत ऑनलाईन परीक्षा

कोल्हापूर : कोरोनाने शिक्षणाची, जगण्याची सर्व परिमाणे बदलून टाकली असताना या नव्या 'न्यू नॉर्मल'शी जोडून घेण्यामध्ये शेतकरी मागे नाहीत. शिवाजी विद्यापीठाच्या रेशीमशास्त्र विषयातील पदविका अभ्यासक्रम. राज्याच्या विविध भागांतील ४६ शेतकऱ्यांनी पूर्ण केला. आता त्यांची ऑनलाइन परीक्षा शनिवारपासून सुरू झाली. ही परीक्षा गुरुवार (दि. ९) पर्यंत चालणार आहे. त्यासाठी प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ. ए. ए. देशमुख, रेशीमशास्त्र अभ्यासक्रम समन्वयक डॉ. ए. डी. जाधव, परीक्षा प्रमुख डॉ. अण्णा गोफणे कार्यरत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 SEP 2021

पुण्यनगरी

कर्मचाऱ्यांना ५ मिनिटांचा योगा ब्रेक देण्याचे आदेश

नवी दिल्ली : सध्याच्या धावपळीच्या युगात शासकीय व खासगी क्षेत्रातील प्रत्येक विभागाने आपापल्या कर्मचाऱ्यांचे आरोग्य जपणे महत्त्वाचे असून त्यासाठी त्यांना पाच मिनिटांचा 'योगा ब्रेक' द्यावा, असे आदेश केंद्र सरकारने रविवारी दिले आहेत. कामाच्या ठिकाणी तणावमुक्त राहणे, रिफ्रेश होणे आणि नव्या दमाने पुन्हा कामात रुजू होण्यासाठी योगा करण्याची मुभा देण्याचे सरकारने बजावले आहे.

केंद्रीय आयुष मंत्रालयाने तज्ज्ञांच्या शिफारशीवरून कर्मचाऱ्यांसाठी पाच मिनिटांचा विशेष 'योगा कार्यक्रम' आखला आहे. त्यास 'वाय-ब्रेक' अर्थात 'योगा विश्रांती' असे नाव देण्यात आले आहे. दिल्ली, मुंबई, चेन्नई, बंगळुरू, हैदराबाद आणि कोलकाता या सहा मेट्रो शहरांत जानेवारी २०२० मध्ये पायलट प्रोजेक्टच्या अंतर्गत 'योगा-ब्रेक' कार्यक्रम जारी करण्यात आला. त्यास चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून आले. त्यानंतर शासकीय व खासगी क्षेत्रातील प्रत्येक कर्मचाऱ्याला दिवसभराच्या कामादरम्यान पाच मिनिटांचा 'योगा-ब्रेक' देण्याचे आदेश केंद्र सरकारने विभागातील कर्मचाऱ्यांना दिले आहेत. योगा कसा करायचा? याचे मार्गदर्शन करण्यासाठी एक विशेष ॲप डेव्हलप करण्यात आले आहे. ते डाऊनलोड करून कर्मचाऱ्यांनी 'योगा-ब्रेक' घ्यावा, असे सरकारने आपल्या आदेशात म्हटले आहे. तणावमुक्त वातावरणात कार्य करणे, रिफ्रेश होणे व नव्या उर्जेने पुन्हा काम सुरू करण्यासाठी योगा महत्त्वाचा आहे.